सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,**
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

दूरध्वनी : ०२४०-२३६१३७२ संकेतस्थळ : https://directorate.marathi.gov.in/ ई-मेल divawb.dol-mh@gov.in

क्र.आस्था-२०२५/ मटंप /प्र.क्र. १०५९ /११०४ दिनांक : **१ ऑक्टोबर २०२५**

**प्रति,**

**संबंधित कार्यालये**

विषय :- भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी **मराठी लघुलेखन परीक्षा- ऑक्टोबर २०२५** परीक्षेची कार्यक्रमपत्रिका, आसन क्रमांक व वेळापत्रक इत्यादीची माहिती संबंधित कार्यालयांना पाठवण्याबाबत.

महोदय,

भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी ८० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी लघुलेखन परीक्षा **शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५** रोजी **छत्रपती संभाजीनगर** सकाळी ठीक १०.३० वाजल्यापासून घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे केंद्र, परीक्षाचालक-नि-ज्येष्ठ पर्यवेक्षकाचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक व परीक्षेचे वेळापत्रक तसेच परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांसाठी सूचना इत्यादी माहिती पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठवण्यात येत आहे.

२. आपल्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यांना या परीक्षेस प्रवेश दिलेला आहे त्यांची नावे, आसन क्रमांक व परीक्षेचे वेळापत्रक यासंबंधीची माहिती सोबत जोडली आहे. आपल्या कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या परीक्षेचा दिनांक, आसन क्रमांक, वेळापत्रक याबाबतची अचूक माहिती तात्काळ देण्याची कृपया व्यवस्था करावी व सदर माहिती मिळाल्याबद्दल संबंधितांची स्वाक्षरी घ्यावी. परीक्षेचे वेळापत्रक परीक्षेपूर्वी किमान दोन दिवस अगोदर परीक्षा केंद्रावर लावण्याबद्दल संबंधित परीक्षाचालकांना यापूर्वीच सूचना देण्यात आल्या आहेत. आपल्या कार्यालयातील एखाद्या कर्मचाऱ्याची दरम्यानच्या काळात अन्य ठिकाणी बदली झाली असेल अगर एखादा कर्मचारी रजेवर गेला असेल तर परीक्षेची सर्व माहिती त्याला परीक्षेपूर्वी कळविण्याची व्यवस्था तात्काळ करावी व तसे केल्याचे या कार्यालयास उलटटपाली कळवावे.

३. या परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांना निश्चितपणे ओळखता यावे म्हणून भाषा संचालनालयामार्फत ओळखपत्राचा नमुना सोबत पाठविण्यात येत आहे. सदर ओळखपत्र संबंधित कर्मचाऱ्याकडून भरून घ्यावे व त्यावर आपल्या समक्ष त्यांची स्वाक्षरी घ्यावी. ओळखपत्रावर आपण अगर आपल्या हाताखालील एखाद्या जबाबदार अधिकाऱ्याने (असा अधिकारी राजपत्रित असावा) स्वाक्षरी करणे जरुरीचे आहे. सदर ओळखपत्र तसेच कार्यालयाने त्यांना दिलेले फोटो असलेले त्यांचे ओळखपत्रही (आयकार्ड) परीक्षाचालकांनी मागणी करताच त्यांनी दाखवणे आवश्यक आहे. ज्या उमेदवाराकडे त्यांचे छायाचित्र (फोटो) असलेले कार्यालयाने दिलेले ओळखपत्र नसेल त्याने परीक्षेच्या ओळखपत्रावर फोटो चिकटवून तो कार्यालय प्रमुखांमार्फत साक्षांकित करून घेणे आवश्यक आहे. फोटो असलेले ओळखपत्र नसल्यास अगर त्याने परीक्षेच्या ओळखपत्रावर फोटो चिकटवून तो साक्षांकित करुन घेतला नसल्यास त्यांना परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही याची संबंधित कर्मचाऱ्यांना जाणीव करुन द्यावी.

...२

४.    आपल्या कार्यालयातील परीक्षेस बसणाऱ्या एखाद्या कर्मचाऱ्याचे नाव त्याचे आवेदनपत्र विहित मुदतीत या कार्यालयाकडे पाठवूनही त्याला प्रवेश दिलेला नसेल तर अशा कर्मचाऱ्यास संबंधित परीक्षाचालकांना परीक्षा केंद्रावर भेटण्यासंबंधी सूचना द्याव्यात. एखाद्या परीक्षार्थ्याच्या नावात, कार्यालयाच्या पत्त्यात अगर यादीत काही त्रुटी आढळून आल्यास त्याबाबत परीक्षेपूर्वी या कार्यालयास तसे लेखी कळवावे.

५. आपल्या कार्यालयामार्फत नामनिर्देशित उमेदवारांस परीक्षेस उपस्थित राहण्याची सूचना द्यावी. पूर्व अनुमती न घेता परीक्षेला अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्याची त्या दिवसाची रजा विनावेतन करण्यात यावी.

६. परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांना परीक्षा प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी १५ (पंधरा) मिनिटे अगोदर परीक्षा दालनात प्रवेश देण्यात येईल. चाचणी दाखल एखाद्या उताऱ्याचे श्रुतलेखनही देण्यात येईल व त्याकरता कर्मचाऱ्यांनी परीक्षेच्या वेळेपूर्वी १५ मिनिटे तरी परीक्षा दालनात उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच परीक्षा सुरु झाल्यावर किमान अर्धा तास तरी त्याला परीक्षा दालन सोडता येणार नाही.

७. भाषा संचालनालयामार्फत मराठी लघुलेखनाची फक्त ८० शब्द प्रति मिनिट गतीची परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५० गुण मिळवावे लागतात. मराठी लघुलेखन परीक्षेच्या गुणांकन पध्दतीच्या माहितीची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे. ती परीक्षेस बसणाऱ्या कर्मचाऱ्यांना कृपया द्यावी. **तसेच मराठी लघुलेखन परीक्षेच्या परीक्षार्थ्यांनी श्रुतलेखन संकेताकृतीमध्येच घेणे आवश्यक आहे. देवनागरी लिपीमध्ये मजकूर स्वरूपात श्रुतलेखन घेतल्यास संबंधित परीक्षार्थ्यांची उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही अशा सूचना कृपया संबंधित परीक्षार्थ्यांना द्याव्यात व त्याबाबत त्यांची स्वाक्षरी घ्यावी.**

८. भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी लघुलेखन परीक्षा ही शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षेसारखी असल्याने या परीक्षेला उपस्थित राहिलेल्या उमेदवारांचा परीक्षेचा कालावधी हा दोन संधींपुरता कर्तव्यार्थ समजावा. या परीक्षेसाठी त्यांना प्रवास करावा लागल्यास नियमानुसार पहिल्या दोन संधींसाठी त्यांना प्रवास खर्च अनुज्ञेय असेल.

९. कृपया या पत्रास सर्वप्राथम्य द्यावे व पत्राची पोच द्यावी, ही विनंती.

**आपला,**

(श्री. बा. उ. जगताप)
**सहायक भाषा संचालक,**
**भाषा संचालनायल, विभागीय कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर**

**सहपत्रे:**

१. परीक्षाचालक-नि-ज्येष्ठ पर्यवेक्षकाचे नाव, दूरध्वनी क्रमांक, केंद्राचा पत्ता व वेळापत्रक, इत्यादीचे विवरणपत्र.
२. उमेदवारांची यादी. (आसन क्रमांक)
३. ओळखपत्राचा नमुना.

**भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी**
**८० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी लघुलेखन परीक्षा**

**<u>परीक्षेचे वेळापत्रक</u>**

**परीक्षेचा दिनांक : शुक्रवार दि १७ ऑक्टोबर २०२५**

**परीक्षेची वेळ :- सकाळी १०.३० वाजल्यापासून**

परीक्षाचालक नि ज्येष्ठ पर्यवेक्षकांचे नाव, दुरध्वनी क्रमांक, परीक्षा केंद्राचा पत्ता तसेच
परीक्षेचे वेळापत्रक इत्यादीची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र. | केंद्र | परीक्षा केंद्राचा पूर्ण पत्ता | परीक्षाचालकाचे नाव व पत्ता | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | छत्रपती संभाजीनगर | प्राचार्य,<br>शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,<br>सुभेदारी विश्रामगृहा जवळ,<br>छत्रपती संभाजीनगर -४३१००१ | श्री. बा. उ. जगताप,<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय,<br>विभागीय कार्यालय,<br>जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,<br>छत्रपती संभाजीनगर- ४३१००१. | (०२४०) २३६१३७२<br>मो. ७५८८५९८१९९ |

@@@@@@@@@@



(श्री. बा. उ. जगताप)
**सहायक भाषा संचालक,**
**भाषा संचालनायल, विभागीय कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर.**

**भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी लघुलेखन परीक्षा, ऑक्टोबर २०२५**

**परीक्षार्थीची यादी**

**केंद्र :- छत्रपती संभाजीनगर** **परीक्षेचा दिनांक :- १७ ऑक्टोबर २०२५**

| आसन क्रमांक | परीक्षार्थी उमेदवाराचे नाव (आडनाव प्रथम) | कार्यालय प्रमुखाचे पदनाम व संपूर्ण पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | श्री. चव्हाण आकाश श्रीरंग | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, छत्रपती संभाजीनगर, | --- |
| २ | श्री. मिरधे युवराज भगवानसिंग | --//-- | --- |
| ३ | श्रीमती दाभाडे रंजना सखाराम | --//-- | --- |
| ४ | श्रीमती धुमाळ अर्चना लक्ष्मण | --//-- | --- |
| ५ | श्रीमती टाकळकर राधिका स्वप्निल | --//-- | --- |
| ६ | श्री. चोपडे अनंत विठ्ठलराव | --//-- | --- |
| ७ | श्री. चौधरी रामकृष्ण सारंगधर | --//-- | --- |
| ८ | श्री. जोशी प्रसाद पुरुषोत्तमराव | --//-- | --- |
| ९ | श्री. सैंदाणे पंकज रविंद्र | --//-- | --- |
| १० | श्री. घुले पंकज अनिल | --//-- | --- |

(श्री. बा. उ. जगताप)
**सहायक भाषा संचालक,**
**भाषा संचालनायल, विभागीय कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर.**

नमुना क्र. ९

**भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**मराठी लघुलेखन परीक्षा**

**ओळख प्रमाणपत्र**

| |
|---|
| उमेदवाराचे<br>साक्षांकित<br>छायाचित्र |

**श्री./श्रीमती ..................................................................................................................हे / या भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या मराठी टंकलेखन परीक्षेस बसत आहेत. त्यांचा आसन क्रमांक ........................ हा असून केंद्र .......................................................... आहे.**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
**उमेदवाराची स्वाक्षरी**
**(उमेदवाराने कार्यालय प्रमुखासमोर स्वाक्षरी करावी)**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
**कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी**

**कार्यालयाचे नाव व पत्ता**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
**उमेदवाराची स्वाक्षरी**
**(उमेदवाराने पर्यवेक्षकासमोर स्वाक्षरी करावी)**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
**पर्यवेक्षकाची स्वाक्षरी**

**विशेष सूचना:-** (१) हे प्रमाणपत्र पर्यवेक्षकाने मागणी करताच दाखल करणे अत्यावश्यक आहे.
(२) अनावश्यक मजकूर खोडावा.